## इंडिगोच्या विमानावर कोसळली वीज; 147 प्रवाशांच्या काळजाचा ठोका चुकला




वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 20 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

आजपासून पिंपरी-चिंचवडमध्ये १५ टक्के पाणी कपात

## वर्धापन दिनी दोन्ही शिवसेनेचा एकमेकांवर हल्लाबोल..!

# 'टायगर शिंदे विरुद्ध सडेतोड ठाकरे'





**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यात कथित 'ऑपरेशन टायगर'ची जोरदार चर्चा सुरू असतानाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर घणाघाती टीका करत आणखी मोठ्या राजकीय घडामोडींचे संकेत दिले. शिवसेनेच्या ६० व्या वर्धापन दिनानिमित्त गोरेगाव येथे आयोजित मेळाव्यात बोलताना त्यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षावर तसेच विरोधकांवर जोरदार शब्दांत निशाणा साधला.**

राज्यात 'ऑपरेशन टायगर' अंतर्गत उद्धव ठाकरे गटातील काही खासदार शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर भाषण करताना शिंदे म्हणाले, "आज ये टायगर आपके सामने खडा है. काल-परवापासून काही जण रोज भुंकत आहेत. पण लक्षात ठेवा, कुत्ते झुंड में आके भोंकते है, शेर अकेला आता है!"

यावेळी त्यांनी विरोधकांवर टीका करत, "कुत्ते भोंकते रहते है, टायगर शिकार करता है. कुत्ते भोंकते रहते है और टायगर दहाडता है. ही खरी शिवसेना आहे. आम्ही वंदनीय बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांवर चालत आहोत. ये तो सिर्फ ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है," असे म्हणत आगामी काळात आणखी राजकीय घडामोडी होण्याचे संकेत दिले.

शिवसेनेच्या स्थापनेचा उद्देश अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, "शिवसेनेचा जन्म मराठी माणसाच्या स्वाभिमानासाठी झाला. मराठीचा निर्धार, देशद्रोह्यांवर प्रहार, लाडक्या बहिणींचा स्वाभिमान, शेतकऱ्यांचा तारणहार आणि वारकऱ्यांचा जयजयकार म्हणजे शिवसेना."

ठाकरे गटावर बोचरी टीका करताना शिंदे म्हणाले, "मी डॉक्टर नसलो तरी आजही ऑपरेशन करतो आणि ऑपरेशन करायला वाघाचं काळीज लागतं, लांडग्याचं नाही. लांडग्याचं कातडं पांघरून वाघ होता येत नाही."

चार वर्षांपूर्वी मिळालेल्या धमक्यांचाही त्यांनी उल्लेख केला. "मला मुंबईत येण्याच्या धमक्या दिल्या गेल्या होत्या. पण मी एकटाच रस्त्याने मुंबईत आलो. तेव्हा धमक्या देणारे घरात बसून पाहत होते. आम्हाला आव्हान देणाऱ्यांनी आधी स्वतःची हिंमत दाखवावी. हे शिवसैनिक बाळासाहेबांच्या विचारांवर चालणारे कडवे कार्यकर्ते आहेत," अशा शब्दांत त्यांनी विरोधकांना प्रत्युत्तर दिले.

दरम्यान, 'ऑपरेशन टायगर'बाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नसली, तरी शिंदे यांच्या भाषणामुळे राज्यातील राजकीय चर्चांना आणखी उधाण आले आहे.

**महाईन्यूज । मुंबई**

**शिवसेनेच्या हिरक महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त आयोजित मेळाव्यात शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी काँग्रेसमध्ये विलिनीकरणाच्या चर्चेला पूर्णविराम देत पक्षाची भूमिका स्पष्ट केली. "शिवसेना ही कोणत्याही पक्षात विलीन होण्यासाठी जन्माला आलेली नाही. मराठी माणसाच्या हक्कासाठी आणि हिंदुत्वाच्या रक्षणासाठी शिवसेनेची स्थापना झाली आहे," असे ठामपणे सांगत त्यांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन केले.**

ठाकरे म्हणाले, "आमचे आयुष्यभर काँग्रेसशी टोकाचे वैर राहिले. आम्ही तब्बल ३० वर्षे भाजपसोबत सत्तेत राहिलो, तरी भाजपात विलीन झालो नाही. मग काँग्रेसमध्ये विलीन होण्याचा प्रश्नच येत नाही." उलट सध्याची राजकीय परिस्थिती पाहता भाजपच शिंदे गटात विलीन होईल, अशी टीकाही त्यांनी केली.

भाषणाच्या सुरुवातीला शिवसेनेच्या ६० वर्षांच्या प्रवासात योगदान देणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना आणि दिवंगत नेत्यांना अभिवादन करत त्यांनी पक्षाच्या संघर्षमय वाटचालीची आठवण करून दिली. "शिवसेनेसाठी अनेकांनी रक्ताचे पाणी केले, तुरुंगवास भोगला. त्यांच्या त्यागामुळेच पक्ष राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचला," असे ते म्हणाले.

पक्षातील काही खासदारांच्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी अप्रत्यक्षपणे बंडखोरांनाही सुनावले. "मी प्रचाराला जात नव्हतो, असे म्हणणारे खासदार मग निवडून कसे आले? लोकसभा निवडणुकीत प्रत्येक मतदारसंघात मी सभा घेतल्या होत्या. त्या सभांमुळेच ते विजयी झाले," असा टोला त्यांनी धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांचे नाव न घेता लगावला.

शिवसेनेचे सहा खासदार शिंदे गटात जाणार असल्याच्या 'ऑपरेशन टायगर' चर्चेवरही त्यांनी टीका केली. "आज राजकारणात फोडाफोडीला वेगवेगळी नावे दिली जात आहेत. चोरीला 'ऑपरेशन' म्हणण्याची वेळ आली आहे. अशा परिस्थितीत लोकशाही वाचवण्यासाठी गरज पडल्यास आपणही 'ऑपरेशन कमळ' राबवावे लागेल," असा इशारा देत त्यांनी भाजपवर निशाणा साधला.

देशातील सध्याच्या राजकीय घडामोडींमुळे जनतेचा लोकशाहीवरील विश्वास कमी होत असल्याची खंत व्यक्त करत उद्धव ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना एकजुटीने लढण्याचे आवाहन केले. कोणत्याही अफवा किंवा दबावाला बळी न पडता शिवसेना अधिक ताकदीने पुढे जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# पुणेरी मेट्रोला विलंबाचा फटका!

## हिंजवडी ते शिवाजीनगर प्रकल्पाच्या खर्चात तब्बल २० टक्क्यांनी वाढ

**महाईन्यूज । पुणे**

**पुणेरी मेट्रोच्या पहिला टप्प्याचे काम पूर्ण झाले असून, जुलै महिन्यात ही सेवा सुरू होणार आहे. मात्र, या संपूर्ण मार्गावरील सर्व स्थानकांवर सेवा सुरू होण्यास पुढील वर्षीचा मार्च महिना उजाडणार आहे. हा प्रकल्प पूर्ण होण्यास मुदतीपेक्षा एक वर्षाहून अधिक काळ लागल्याने एकूण खर्चात सुमारे २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. हा खर्चाचा बोजा पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड (पीआयटीसीएमआरएल) कंपनी उचलणार आहे.**



हिंजवडी ते शिवाजीनगरदरम्यानच्या पुणेरी मेट्रोच्या कामाच्या प्रगतीची माहिती 'पीआयटीसीएमआरएल' कंपनीचे मुख्याधिकारी अनिल कुमाल सैनी आणि मुख्य वित्तीय अधिकारी मितुल झवेरी यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली. हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गावर एकूण २३ स्थानके आहेत. यातील माण ते आर. के. लक्ष्मण संग्रहालय (बालेवाडी) या १२ स्थानकांदरम्यान पहिल्या टप्प्यात सेवा सुरू करण्याचे नियोजन आहे. पहिल्या टप्प्यातील मेट्रो सेवा सुरू करण्यासाठी मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे आता राज्य सरकारकडून या मेट्रोच्या उद्घाटनाचा मुहूर्त निश्चित केला जाईल. त्या वेळी ही मेट्रो सेवा सुरू होणार आहे. ही सेवा १५ जुलैपासून सुरू करण्याचे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) नियोजन आहे.

या प्रकल्पाला विलंब झाल्यामुळे खर्चात होणाऱ्या वाढीबाबत मुख्य वित्तीय अधिकारी मितुल झवेरी म्हणाले की, मेट्रो प्रकल्प पूर्ण करण्यास नियोजित मुदतीपेक्षा एक वर्षाहून अधिक काळ उशीर लागला आहे. यामुळे प्रकल्पाच्या एकूण खर्चात वाढ होणार आहे. प्रामुख्याने ही वाढ प्रकल्पासाठी घेतलेल्या कर्जाच्या रकमेवरील व्याजात होईल. हा आर्थिक बोजा कंपनी उचलणार आहे. प्रकल्प विलंब झाल्यामुळे खर्चात एकंदरीत सुमारे २० टक्के वाढ अपेक्षित आहे.

मेट्रो प्रकल्पाला होत असलेल्या विलंबाबत अनिल कुमार सैनी म्हणाले, 'पुणेरी मेट्रोच्या कामास गणेशखिंड रस्त्यावर प्रामुख्याने विलंब लागला. शहरातील गर्दीच्या भागात काम करताना अनेक अडचणी येतात. रहदारीच्या वेळी काम करता येत नसल्याने रात्रीच्या वेळी काम करावे लागते. यामुळे या कामास उशीर झाला आहे. आमच्याकडून लवकरात लवकर काम पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पहिल्या टप्प्यातील १२ स्थानकांपर्यंत सेवा करण्याचे काम पूर्ण झाले असून, त्यावर सेवा सुरू करण्यास मंजुरी मिळाली आहे. उरलेल्या ११ स्थानकांपर्यंत सेवा सुरू करण्याचे काम ऑगस्टअखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर भोसलेनगर आणि शिवाजीनगर ही स्थानके वगळून सेवा सुरू करता येईल.'

'पुणेरी मेट्रोच्या भोसलेनगर आणि शिवाजीनगर या दोन स्थानकांवरील काम पुढील वर्षी मार्चअखेरीस पूर्ण होईल. मेट्रो प्रकल्पाच्या कामास मुदतीपेक्षा एक वर्षाहून अधिक काळ विलंब झाला आहे. या विलंबामुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाली आहे. हा वाढलेल्या खर्चाचा बोजा 'पीआयटीसीएमआरएल' उचलेल. या मार्गावरील सर्व स्थानकांवरील सेवा सुरू झाल्यानंतर दैनंदिन प्रवासी संख्या २ ते २.५ लाखांवर जाईल,' असे सैनी यांनी सांगितले.

### पुणेरी मेट्रो - हिंजवडी ते शिवाजीनगर

- एकूण लांबी - २३.३ किलोमीटर
- एकूण गाड्या - २२
- कमाल वेग - ताशी ८५ किलोमीटर
- सरासरी वेग - ताशी ३७ ते ४० किलोमीटर
- सध्याचा प्रवासाचा वेळ - १ तास ३० मिनिटे
- मेट्रोतून प्रवासाचा वेळ - ४५ मिनिटे
- मेट्रो प्रकल्पाचा वाढता खर्च
- प्रस्तावित खर्च - ८ हजार ३१३ कोटी रुपये
- विलंबामुळे खर्चात वाढ - सुमारे २० टक्के

### मेट्रोचा पहिला टप्पा

माण ते आर. के. लक्ष्मण संग्रहालय
स्थानके - १२
लांबी १३.३ किलोमीटर
सुरू होणे अपेक्षित - १५ जुलै

### मेट्रोचा दुसरा टप्पा

बालेवाडी हायस्ट्रीट ते जिल्हा न्यायालय
स्थानके - ११
लांबी - १० किलोमीटर
काम पूर्ण होणे अपेक्षित - ऑगस्ट

# पुणे जिल्ह्यात पाणी तळाला; गेल्या वर्षीच्या तुलनेत तब्बल ९० टीएमसी पाणी कमी

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे विभागातील धरणांमधील उपयुक्त जलसाठा ७७ अब्ज घनफूट (टीएमसी) असून गतवर्षीच्या १६९.९ टीएमसी (३१.१६ टक्के) च्या तुलनेत सुमारे ९०.९ टीएमसी इतकी तूट असल्याची माहिती पाणी नियोजनासंदर्भातील बैठकीत देण्यात आली. दरम्यान, धरणे, कालवे, नद्या तसेच अन्य जलस्रोतांमधील अनधिकृत आणि बेकायदा पाणीउपसा रोखण्यासाठी महसूल, पोलीस आणि जलसंपदा विभागाच्या संयुक्त पथकांमार्फत विशेष तपासणी मोहीम राबवावी, असे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी गुरुवारी दिले.**



पर्जन्यमान विश्लेषण, धरणातील पाणीसाठ्याचा आणि पाणीवापराचा जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डुडी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत गुरुवारी आढावा घेतला. त्या वेळी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून तुटीची माहिती देण्यात आली. पुणे पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रवीण कोल्हे, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके, उपजिल्हाधिकारी चारुशीला मोहिते, कार्यकारी अभियंता राजेंद्र डुबल, अधीक्षक अभियंता किरण देशमुख यांच्यासह अन्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

'खडकवासला, पानशेत, वरसगाव, टेमघर धरण साखळी प्रकल्पाची जिवंत साठा क्षमता २९.१५ टीएमसी असून ४.१३ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. तसेच, पवना धरणामध्ये १.६५ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरासाठी ऑगस्टअखेरपर्यंत अंदाजित अनुक्रमे ४ आणि दीड टीएमसी पिण्याच्या पाण्याच्या गरजेनुसार योग्य नियोजन करावे,' अशी सूचना डुडी यांनी केली.

ते म्हणाले, 'पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका, नगरपरिषदा, ग्रामपंचायती, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासह अन्य पाणी वापरकर्त्या संस्थांनी उपलब्ध साठा आणि आगामी गरज लक्षात घेऊन पाणीवापराचे पुनर्नियोजन करावे. सर्व संबंधित विभागांनी जलसाठा, पर्जन्यमान, आवक आणि पाणी वापराचा साप्ताहिक आढावा घेऊन त्याचा अहवाल जिल्हा प्रशासनास सादर करावा.'

'परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जलसंपदा विभागाने जलाशय प्रचलन - संवर्धन (कंझर्वेशन रिझर्व्हायर ऑपरेशन) धोरण अवलंबून जलाशय संचालन करावे आणि आवश्यकतेनुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. खडकवासला, पानशेत, वरसगाव, टेमघर धरण साखळी प्रकल्पातील उपलब्ध ४.१३ टीएमसी आणि पवना धरणातील १.६५ टीएमसी पाणीसाठ्याचे काटेकोर व्यवस्थापन करावे, कोणत्याही परिस्थितीत जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने आवश्यक उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करावी,' अशी सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केली.

# आजपासून पिंपरी-चिंचवडमध्ये १५ टक्के पाणी कपात

## पवना धरणातील उपयुक्त पाणीसाठा केवळ १९ टक्क्यांवर



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात आज (शनिवार)पासून १५ टक्के पाणी कपात लागू करण्यात आली आहे. एल-निनोच्या प्रभावामुळे यंदा पावसाने अपेक्षित हजेरी लावली नसल्याने पवना धरणातील उपयुक्त पाणीसाठा केवळ १९ टक्क्यांवर आला आहे. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठा पुढील काळासाठी पुरेल, या उद्देशाने पाटबंधारे विभागाने महापालिकेच्या पाणी वाटपात १५ टक्के कपात करण्याचे आदेश दिले असून, त्यानुसार महापालिकेने आजपासून या निर्णयाची अंमलबजावणी सुरू केली आहे.**



पिंपरी-चिंचवड शहराला मुख्यत्वे पवना धरणातून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, यंदा मान्सूनच्या विलंबामुळे आणि कमी पर्जन्यमानामुळे धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी झाला आहे. वाढती लोकसंख्या आणि वाढती पाण्याची मागणी लक्षात घेता उपलब्ध जलसाठ्याचे नियोजन करण्यासाठी पाणी कपातीचा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने या कपातीची अंमलबजावणी सुरू केली असून, शहरातील काही भागांमध्ये पाणीपुरवठ्याच्या वेळेत बदल, कमी दाबाने पाणी येणे तसेच पुरवठ्याचा कालावधी कमी होण्याची शक्यता आहे. परिस्थितीनुसार विभागनिहाय पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात येणार असून, नागरिकांनी संयम बाळगून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

एल-निनोच्या प्रभावामुळे राज्यातील अनेक धरणांमधील जलसाठा कमी झाला असून, पवना धरणाची स्थितीही चिंताजनक बनली आहे. मान्सूनने लवकरच जोरदार हजेरी लावली नाही, तर पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरण्याची गरज निर्माण झाली आहे.

दरम्यान, महापालिकेने नागरिकांना अनावश्यक पाण्याचा वापर टाळण्याचे आवाहन केले आहे. वाहन धुणे, बागेला जास्त पाणी देणे, नळ सुरू ठेवणे यांसारख्या गोष्टी टाळून पाण्याची बचत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांच्या सहकार्यामुळेच उपलब्ध पाणीसाठ्याचे प्रभावी नियोजन शक्य होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

### प्रत्येक थेंब महत्त्वाचा!

शहरासमोरील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता उपलब्ध जलसाठ्याचे नियोजन करण्यासाठी १५ टक्के पाणी कपात लागू करण्यात आली आहे. मान्सून समाधानकारक होईपर्यंत पाण्याचा अपव्यय टाळणे, गळती तातडीने दुरुस्त करणे आणि आवश्यक तेवढ्याच पाण्याचा वापर करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. पाण्याची बचत हीच भविष्यातील टंचाईवर मात करण्याची प्रभावी गुरुकिल्ली ठरणार आहे.

पाणी कपातीमुळे नागरिकांना काही प्रमाणात गैरसोय होण्याची शक्यता असली, तरी भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी हा निर्णय आवश्यक असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. मान्सूनच्या प्रगतीवर पुढील पाणीपुरवठ्याचे नियोजन अवलंबून राहणार असल्याने येत्या काही दिवसांतील पावसाकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

### पाणी कपात अपरिहार्य

पवना धरणातील उपयुक्त पाणीसाठा केवळ १९ टक्क्यांवर आल्याने आजपासून पिंपरी-चिंचवड शहरात १५ टक्के पाणी कपात लागू करण्यात आली आहे. एल-निनोमुळे कमी झालेल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर पाटबंधारे विभागाच्या निर्देशानुसार हा निर्णय घेण्यात आला असून, काही भागांमध्ये पाणीपुरवठ्याच्या वेळा व दाबावर परिणाम होऊ शकतो. नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

# काही दिवसांवर आले होते लग्न; लोहगडावर काळाने घातला घाला!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**लग्न अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले असताना होणाऱ्या पत्नीचा वाढदिवस साजरा करण्यासाठी मित्रमंडळीसह लोहगड किल्ल्यावर गेलेल्या २४ वर्षीय तरुणाचा पाय घसरून खोल दरीत पडल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना गुरुवारी (दि. १८) दुपारच्या सुमारास घडली. या घटनेमुळे गहुंजे परिसरात शोककळा पसरली असून कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.**




मिळालेल्या माहितीनुसार, केतन अग्रवाल (वय २४, रा. लोढा हौसिंग कॉम्प्लेक्स, गहुंजे) हा आपल्या होणाऱ्या पत्नीचा वाढदिवस साजरा करण्यासाठी मित्रांसह लोहगड किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी गेला होता. पावसाळी वातावरणात किल्ल्यावरील विविध ठिकाणी फिरत असताना एका ओलसर आणि निसरड्या कड्याजवळ त्याचा अचानक तोल गेला. क्षणातच तो खोल दरीत कोसळला. या अपघातात त्याला गंभीर दुखापत झाली.

घटनेची माहिती मिळताच शिवदुर्ग मित्र, लोणावळा, वन्यजीव रक्षक संस्थेचे बचाव पथक, स्थानिक ट्रेकर्स आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अत्यंत कठीण आणि धोकादायक परिस्थितीत बचाव मोहीम राबवून केतनला दरीतून बाहेर काढण्यात आले. त्यानंतर त्याला तातडीने जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तपासणीनंतर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

केतनचे लग्न काही दिवसांवर आले होते. त्यामुळे दोन्ही कुटुंबांमध्ये आनंदाचे वातावरण होते. होणाऱ्या पत्नीचा वाढदिवस संस्मरणीय करण्यासाठी आखलेला हा ट्रेक दुर्दैवी ठरला. आनंदाच्या क्षणांवर दुःखाचे सावट पसरल्याने कुटुंबीयांसह मित्रपरिवाराला मोठा मानसिक धक्का बसला आहे. परिसरातही या घटनेबद्दल हळहळ व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, पावसाळ्यात किल्ले आणि पर्यटनस्थळांवर ट्रेकिंग करणाऱ्या पर्यटकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन बचाव पथकांनी केले आहे. ओलसर आणि निसरड्या भागात जाणे, धोकादायक ठिकाणी उभे राहणे किंवा सेल्फी काढण्यासाठी जीव धोक्यात घालणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच हवामानाचा अंदाज घेऊनच ट्रेकचे नियोजन करावे आणि सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करावे, असेही प्रशासनाने म्हटले आहे.

### लग्नाआधीच काळाचा घाला...

होणाऱ्या पत्नीचा वाढदिवस साजरा करण्यासाठी मित्रांसह लोहगड किल्ल्यावर गेलेल्या २४ वर्षीय केतन अग्रवालचा पाय घसरून खोल दरीत पडल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. अवघ्या काही दिवसांवर आलेल्या लग्नाची तयारी सुरू असतानाच घडलेल्या या दुर्घटनेमुळे दोन्ही कुटुंबांवर शोककळा पसरली. पावसाळ्यात किल्ल्यांवरील निसरड्या वाटांवर जीव धोक्यात घालणारे साहस टाळून पर्यटकांनी अधिक सावधगिरी बाळगावी, असे आवाहन बचाव पथकांनी केले आहे.




## भूमिका

**महाराष्ट्राच्या राजकारणात पक्षांतर आणि बंडखोरी हा काही नवीन विषय नाही. मात्र, प्रत्येक वेळी त्याची कारणे, परिणाम आणि राजकीय संदेश वेगळा असतो. शिवसेनेतील ताज्या घडामोडींनी पुन्हा एकदा 'मातोश्री'च्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उभे केले आहे.**

# मातोश्रीच्या निष्ठेला ओहोटी की सत्तेच्या राजकारणाचा नवा अध्याय?

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील सहा खासदार एकनाथ शिंदे यांच्या गटात जाण्याच्या तयारीत असल्याच्या घडामोडींनी पक्षातील अंतर्गत अस्वस्थता पुन्हा समोर आणली आहे.



शिवसेनेच्या इतिहासात बंडखोरीची सुरुवात छगन भुजबळ यांच्या निर्गमनापासून झाली. त्यानंतर राज ठाकरे, नारायण राणे, गणेश नाईक आणि अलीकडे एकनाथ शिंदे यांनी पक्षाला मोठे धक्के दिले. प्रत्येक वेळी पक्षाने बंडखोरांवर कठोर टीका केली, मात्र पक्षातील फूट रोखण्यात नेतृत्वाला अपेक्षित यश मिळाले नाही. यामुळे शिवसेनेतील निष्ठा ही व्यक्तीशी आहे की विचारांशी, हा प्रश्न सातत्याने उपस्थित होत आहे.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या एकजुटीचा लाभ घेत विजय मिळवणारे काही खासदार आता सत्ताधारी गटाकडे झुकताना दिसत आहेत. त्यामुळे मतदारांच्या विश्वासाचा आणि जनादेशाचा आदर राखला जातो आहे का, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे. राजकारणात बदलत्या समीकरणांनुसार निर्णय घेतले जात असले तरी मतदारांच्या अपेक्षांनाही महत्त्व असते. पक्ष बदलताना केवळ राजकीय गणित नव्हे, तर नैतिकतेचाही विचार होणे आवश्यक आहे. दुसरीकडे, या घडामोडींमध्ये भारतीय जनता पक्ष, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या भूमिकांकडेही लक्ष लागले आहे. कोणत्या गटाला किती राजकीय बळ द्यायचे, याचा अंतिम निर्णय दिल्लीतील नेतृत्वाच्या भूमिकेवर अवलंबून असल्याचे चित्र आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील राजकारणातील पुढील समीकरणे अधिक गुंतागुंतीची होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या संपूर्ण प्रकरणातून आणखी एक वास्तव समोर येते. आजच्या राजकारणात विचारधारा, निष्ठा आणि संघटनात्मक बांधिलकी यांच्यापेक्षा सत्तेतील सहभागाला अधिक महत्त्व दिले जात असल्याचे दिसते. त्यामुळे पक्षांतर ही आता अपवादात्मक घटना राहिलेली नसून, राजकीय रणनीतीचा भाग बनत चालली आहे. ही प्रवृत्ती लोकशाहीसाठी कितपत हितावह आहे, यावर गंभीर चिंतन होणे गरजेचे आहे.

या घडामोडींमुळे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. पक्षातील उर्वरित कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधी यांना एकत्र ठेवत संघटना अधिक मजबूत करण्यासाठी आत्मपरीक्षण आणि नव्या रणनीतीची आवश्यकता आहे. त्याचवेळी, पक्षांतर करणाऱ्या नेत्यांनाही जनतेसमोर आपल्या भूमिकेचे स्पष्ट स्पष्टीकरण द्यावे लागेल.

राजकारणात बदल अपरिहार्य असतात; मात्र ते केवळ सत्तेसाठी आहेत की जनहितासाठी, याचे उत्तर शेवटी मतदारच देतात. त्यामुळे महाराष्ट्रातील या नव्या राजकीय घडामोडींचा अंतिम निकाल आगामी निवडणुकांमध्ये जनतेच्या कौलातूनच स्पष्ट होईल.

## प्रासंगिक »

### चांगला राजा

**एकदा एका तळ्यातला बेडकांना वाटले, की आपल्याला एक राजा हवा. म्हणून त्यांनी देवाकडे तशी मागणी केली. तेव्हा देवाला हसूच आले व त्याने 'हा घ्या राजा !' म्हणून एक लाकडी ओंडका तळ्यात टाकला. तो पाण्यावर पडताच पाणी उसळले.**

ते पाहून सगळे बेडूक घाबरले आणि बाजूला जाऊन बसले. थोड्या वेळाने पाणी शांत झाल्यावर तो ओंडका काही हालचाल करीत नाही असे पाहून त्या-च्यावर चढले व उड्या मारू लागले.

मग त्यांना वाटले की या राजापेक्षा दुसरा चांगला राजा हवा. तेव्हा त्यांनी देवाची प्रार्थना करून दुसरा चांगला राजा पाठवण्याची विनंती केली. देवाने एक बगळा पाठविला. त्याने बेडकांना मारून खायला सुरुवात केली. म्हणून बेडकांनी देवाकडे अजून चांगल्या राजाची मागणी केली.

ते ऐकून देव म्हणाला, 'मी तुम्हांला पहिला राजा पाठवला होता तो तुम्हांला आवडला नाही. आता तुमचं कर्म तुम्हीच भोगा.'

- तात्पर्य : चांगले संस्कार हेच उत्तम चारित्र्याचा भक्कम पाया असतात.

अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या ताज्या सामंजस्य करारामुळे जागतिक स्तरावर काही प्रमाणात दिलास्याचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून मध्य-पूर्वेतील तणावामुळे जगभरात युद्धाच्या भीतीचे सावट निर्माण झाले होते.

# युद्धबंदीचा दिलासा; शांततेची हमी नव्हे!



त्यामुळे या कराराकडे सकारात्मक पाऊल म्हणून पाहिले जात असले, तरी तो कायमस्वरूपी शांततेचा मार्ग ठरेल, असे मानणे घाईचे ठरेल. या संघर्षात अमेरिकेने इराणचा अण्वस्त्र कार्यक्रम रोखणे, क्षेपणास्त्र क्षमता कमकुवत करणे आणि तेथील सत्ताधारी व्यवस्थेवर दबाव आणणे अशी उद्दिष्टे ठेवली होती. मात्र, युद्धानंतरची परिस्थिती पाहता ही उद्दिष्टे पूर्णपणे साध्य झाल्याचे दिसून येत नाही. उलट, मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि लष्करी खर्च करूनही अमेरिका पुन्हा वाटाघाटीच्या टेबलावर परतली आहे. त्यामुळे या कराराकडे अमेरिकेची रणनीतिक माघार म्हणूनही पाहिले जात आहे.

दुसरीकडे, इराणनेही युद्धातून काही महत्त्वाचे संदेश दिले आहेत. होर्मुझ सामुद्रधुनीवरील नियंत्रणाचा प्रभावी वापर करून जागतिक तेलपुरवठ्यावर दबाव निर्माण करण्याची त्याची क्षमता पुन्हा अधोरेखित झाली. भविष्यातील कोणत्याही चर्चेत हा मुद्दा इराणसाठी महत्त्वाचा दबावतंत्राचा भाग ठरू शकतो. त्यामुळे सध्याची युद्धबंदी ही संघर्षाचा शेवट नसून, पुढील वाटाघाटींसाठी घेतलेली विश्रांती असल्याचे चित्र आहे.

या कराराचा सर्वाधिक सकारात्मक परिणाम जागतिक तेलबाजारावर झाला आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर वाढलेले कच्च्या तेलाचे दर आता काही प्रमाणात कमी होऊ लागले आहेत. भारतासारख्या मोठ्या तेल आयातदार देशासाठी ही अत्यंत दिलासादायक बाब आहे. तेलाच्या किमती नियंत्रणात राहिल्यास महागाईवर आळा बसण्यास मदत होईल, तसेच चालू खात्यातील तूटही मर्यादित ठेवता येईल. याशिवाय, इराणशी व्यापार आणि चाबहार बंदरासारख्या धोरणात्मक प्रकल्पांना नव्याने गती मिळण्याची शक्यताही निर्माण झाली आहे.

तथापि, अमेरिका आणि इराण यांच्यातील दीर्घकालीन अविश्वास, प्रादेशिक संघर्ष, तसेच इराण समर्थित संघटनांची भूमिका या सर्व बाबी अद्याप कायम आहेत. त्यामुळे येत्या काळातील वाटाघाटी यशस्वी होणे हे दोन्ही देशांच्या राजकीय इच्छाशक्तीवर अवलंबून असेल.एकंदरीत, या सामंजस्य करारामुळे जगाला तात्पुरता दिलासा मिळाला असला, तरी मध्य-पूर्वेतील संकट पूर्णपणे टळलेले नाही. शांततेचा मार्ग अजूनही खडतर आहे. त्यामुळे या युद्धबंदीला अंतिम समाधान नव्हे, तर नव्या राजनैतिक प्रयत्नांची सुरुवात म्हणूनच पाहणे अधिक योग्य ठरेल.

## ।। अभंगवाणी ।।



रुपी जडले लोचन ।
पायी स्थिरावले मन॥१॥

देहभाव हरपला ।
तुज पाहतां विठ्ठला ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ठाकरेंचा सातवा खासदारही फुटला?

## शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे नेते रामदास कदम यांचं मोठं वक्तव्य

**महाईन्यूज । ठाणे**

**गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडत आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून राबवण्यात येणाऱ्या 'ऑपरेशन टायगर'ची मोठी चर्चा सुरू आहे. शिवसेना (ठाकरे) पक्ष पुन्हा एकदा फुटीच्या उंबरठ्यावर असून ठाकरेंच्या सेनेचे ६ खासदार फुटल्याची चर्चा आहे. हे खासदार फुटल्याच्या चर्चा समोर आल्यानंतर शिवसेनेकडून (ठाकरे) व्हिप जारी करण्यात आला होता. पण ठाकरे गटाच्या संसदीय दलाच्या या बैठकीला हे ६ खासदार उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे आता हे ६ खासदार फुटल्याचं निश्चित मानलं जात आहे. मात्र, असं असलं तरी अद्याप त्या ६ खासदारांची भूमिका समोर आलेली नाही.**



ठाकरे सेनेच्या फुटलेल्या ६ खासदारांच्या संदर्भात आता राजकीय वर्तुळातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया समोर येत आहेत. यावरून आरोप-प्रत्यारोपही सुरू आहेत. असं असतानाच शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते रामदास कदम यांनी आणखी एक मोठं वक्तव्य केलं आहे. 'सहा नाही, तर सातव्या खासदाराची देखील पत्रावर सही आहे, पण त्याला मंत्रिपदाचा शब्द हवा होता', असा दावा रामदास कदम यांनी माध्यमांशी बोलताना केला आहे. कदमांच्या या वक्तव्यामुळे ठाकरे गटात पुन्हा खळबळ उडाली आहे.

"तुमच्या (उद्धव ठाकरे यांच्या) आजूबाजूचे जे लोक आहेत, ते तुम्हाला फसवत आहेत. सहा नाही, तर सातव्या खासदाराची देखील त्या पत्रावर सही आहे आणि तो खासदार आज तुमच्या (उद्धव ठाकरे) बाजूला बसला आहे. तो सातवा खासदार मंत्रिपदाची मागणी करत होता. मला आधी मंत्रिपदाचा शब्द द्या, असं तो सातवा खासदार म्हणत होता. त्या सातव्या खासदाराने देखील त्या पत्रावर सही केलेली आहे. मात्र, तोच तुमच्या बाजूला आता बसत आहे. उद्धवजी हे तुम्हाला फसवत आहेत, हे लोक तुमच्या भोळेपणाचा फायदा घेत आहेत", असं रामदास कदम यांनी म्हटलं आहे.

'ऑपरेशन टायगर'वरून सध्या आरोप-प्रत्यारोपाने राजकारण चांगलंच तापलं आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते तथा मंत्री शंभूराज देसाई यांनी एक मोठा दावा केला. शंभूराज देसाई म्हणाले की, "काही प्रतिनिधींनी मला माहिती विचारली होती तेव्हाच मी सांगितलं होतं की, ठाकरे गटाच्या खासदारांमध्ये खदखद आहे, अस्वस्थता आहे. कारण शेवटी आम्ही सर्वांनी एकत्र काम केलेलं आहे. आताही सभागृहात आमच्या एकमेकांच्या गाठीभेटी होत असतात. या ६ खासदारांच्या माध्यमातून खदखद बाहेर आलेली आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या आमदारांची परिस्थिती देखील या ६ खासदारांपेक्षा वेगळी नाही."

### ठाकरेंच्या आमदारांमध्ये अस्वस्थता?

"ठाकरे गटाच्या आमदारांमध्ये खासदारांपेक्षाही जास्त खदखद आहे. कारण पक्षाच्या नेतृत्वाकडून पाठबळ मिळत नाही. केंद्र सरकार किंवा राज्य सरकारच्या दरबारी जी काही कामे प्रलंबित आहेत, त्या कामांचा पाठपुरावा करण्यासाठी पक्षाचं नेतृत्व त्यांना मदत करत नाही. मग लोकांना काय उत्तर द्यायचं? लोकांनी निवडून दिलेलं असतं. मतदारसंघातील प्रश्न कसे सोडवायचे? अशी खदखद ठाकरे गटाच्या आमदारांमध्ये आहे. त्यामुळे कदाचित खासदारांच्या बाबतीत जे घडलं, त्याची आमदारांच्या बाबतीत पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही", असं शंभूराज देसाई यांनी म्हटलं आहे.

# मराठी भाषा प्रमाणपत्र नसल्यास १५ ऑगस्टनंतर रिक्षा-टॅक्सी चालकांवर कारवाई

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यातील अमराठी रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे ज्ञान मिळावे आणि प्रवाशांशी संवाद अधिक सुलभ व्हावा यासाठी परिवहन विभागाने धोरणात्मक व ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. १ जून ते १५ ऑगस्ट या कालावधीत सर्व अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी चार तासांचा 'मराठी भाषा संवाद पाठ्यक्रम' पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले असून, १५ ऑगस्टनंतर प्रमाणपत्र नसलेल्या चालकांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.**





परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमासाठी शासनाने महाराष्ट्र राज्य मराठी भाषा विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ या संस्थांची अधिकृत तज्ज्ञ संस्था म्हणून नियुक्ती केली आहे. या संस्थांमार्फतच चालकांना मोफत मराठी भाषा प्रशिक्षण दिले जाणार असून, त्यांच्याकडून देण्यात येणारे प्रमाणपत्रच परिवहन विभागाकडून ग्राह्य धरले जाणार आहे.

परिवहन विभागाचे सहआयुक्त रवी गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात (एमएमआर) प्रशिक्षण वर्ग मोठ्या प्रमाणावर सुरू असून यासाठी सुमारे ७१ अभ्यास केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. या मोहिमेला शैक्षणिक बळ देण्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषदेचे सुमारे साडेचार हजार शिक्षक प्रशिक्षण कार्यात सहभागी झाले आहेत. तसेच सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांचे (आरटीओ) अधिकारी चालकांना आवश्यक सहकार्य करत आहेत.

प्रवाशांशी संवाद साधताना भाषेची अडचण दूर करणे, सेवा अधिक दर्जेदार बनविणे आणि चालकांच्या व्यावसायिक संधी वाढविणे हा या अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे विभागाने कळविले आहे. मराठी भाषेचे प्राथमिक ज्ञान मिळाल्याने प्रवासी व चालक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होणार असून दैनंदिन व्यवहार सुलभ होण्यास मदत मिळणार आहे.

परिवहन विभागाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे की, १५ ऑगस्ट पासून नंतर अधिकृत प्रमाणपत्र नसलेल्या अमराठी चालकांवर नियमानुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाईल. मात्र कोणावरही कारवाई करण्याचा उद्देश नसून, सर्व चालकांनी या मोफत प्रशिक्षणाचा लाभ घेऊन वेळेत प्रमाणपत्र मिळवावे, असे आवाहन सहआयुक्त रवी गायकवाड यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री विजय यांना सुप्रीम कोर्टाचा दिलासा

## विश्वासदर्शक ठरावावेळी ‘घोडेबाजार’ झाल्याचा आरोप करणारी याचिका फेटाळली

**महाईन्यूज । तमिळनाडू**

**तमिळनाडूच्या विधानसभा निवडणुकीत आपला करीश्मा दाखवणारे नेते जोसेफ विजय यांनी १० मे रोजी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी जोसेफ विजय यांना विधानसभेत बहुमत सिद्ध करण्याचे निर्देश दिले होते. राज्यपालांच्या आदेशानुसार, मुख्यमंत्री विजय यांनी १३ मे रोजी विधानसभेत विश्वासदर्शक ठराव बहुमताने जिंकला होता.**



विश्वासदर्शक ठरावाच्या कामकाजादरम्यान काँग्रेस, सीपीआय(एम), व्हीसीके आणि इंडियन युनियन मुस्लिम लीग (आययूएमएल) यांनी विजय यांच्या नेतृत्वाखालील सरकारला पाठिंबा दिला. दरम्यान, तमिळनाडू विधानसभेत १३ मे रोजी झालेल्या विश्वासदर्शक ठरावावेळी कथित अनियमितता आणि ‘घोडेबाजार’ झाल्याचा आरोप करण्यात आला होता. तसेच विश्वासदर्शक ठरावावेळी झालेल्या कथित अनियमिततेची चौकशी करण्यात यावी, या मागणीसाठी थेट सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती.

या याचिकेवर आता सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली असून तमिळनाडू विधानसभेत विश्वासदर्शक ठरावावेळी ‘घोडेबाजार’ झाल्याचा आरोप करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळून लावली आहे. या आरोपांना पुष्टी देणारा कोणताही पुरावा नसल्याने त्याबाबत विचार करता येणार नाही, असं निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवलं आहे. त्यामुळे मुख्यमंत्री विजय यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, या याचिकेद्वारे विश्वासदर्शक ठरावाशी संबंधित कथित राजकीय गैरव्यवहाराची सीबीआयकडून चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. तसेच प्रस्तावित चौकशी पूर्ण होईपर्यंत तमिळनाडूमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याची विनंती देखील या याचिकेत करण्यात आली होती.

मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री विजय यांना मोठा दिलासा मिळाला आहे.



### सर्वोच्च न्यायालयाने काय म्हटलं?

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती व्ही.मोहना यांच्या खंडपीठाने ही याचिका फेटाळली आहे. यावेळी निरीक्षण नोंदवलं न्यायालयाने म्हटलं की, “हे आरोप अस्पष्ट, निराधार आणि वरकरणी केलेले दिसत आहेत. त्या दाव्यांना पुष्टी देण्यासाठी रेकॉर्डवर कोणतीही विश्वसनीय सामग्री उपलब्ध असल्याचं दिसत नाही. त्यामुळे चौकशीचे आदेश देण्यासारखा कोणताही विश्वसनीय पुरावा न्यायालयासमोर सादर करण्यात आलेला नाही.”

## अफगाणिस्तानचा पाकिस्तानात घुसून हवाई हल्ला; दोन प्रांतांमधील तळांना केले लक्ष्य

**महाईन्यूज । अफगाणिस्तान**

**अफगाणिस्तानने पाकिस्तानवर शुक्रवारी हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. अफगाण सुरक्षा दलाने पाकिस्तानमधील दोन प्रांतांत हवाई हल्ला केल्याचे वृत्त आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्था रॉयटर्सने प्रसिद्ध केले आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमध्ये चकमक झाली यानंतर दोन्ही देशांनी युद्धविरामाची घोषणा केली पण, आता अफगाणिस्तानने पाकिस्तानवर हल्ला केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.**



अफगाण-तालिबान संरक्षण मंत्रालयाने हल्ल्याची पुष्टी केल्याचे रॉयटर्सने म्हटले आहे. अफगाणिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या पाकिस्तानच्या बलुचिस्तान आणि खैबर पख्तुनख्वा प्रांतांमधील ठिकाणांवर गुरुवारी रात्री ‘हवाई दला’ने हल्ला केला. अफगाण-तालिबान संरक्षण मंत्रालयाने याबाबत एक्स या सोशल मीडियावर पोस्ट करुन माहिती दिली आहे. हा हल्ला कसा करण्यात आला? याची माहिती मात्र अफगाणी मंत्रालयाने दिलेली नाही. अफगाणिस्तानकडे लढाऊ विमाने नाहीत पण, त्यांच्याकडे जवळपास सहा विमानं आणि २३ हेलिकॉप्टर असल्याची माहिती लंडनच्या स्ट्रॅटेजिक स्टडी संस्थेने प्रसिद्ध केली आहे. त्यांच्याकडे ड्रोन देखील असल्याचे सांगितले जाते.

अफगाणिस्तानवर हल्ला करण्यासाठी नियोजन आणि माहिती गोळा करण्यासाठी हे तळ निर्माण करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. यापूर्वी देखील या ठिकाणांचा अफगाणिस्तानवर हल्ला करण्यासाठी वापर केल्याचा आरोप अफगाणिस्तानकडून करण्यात आला आहे. हवाई हल्ल्यात लक्ष्याचा अचूक वेध घेण्यात यश आल्याचा दावा अफगाणिस्तान संरक्षण मंत्रालयाने केला आहे. दरम्यान, या हल्ल्यात किती जणांचा मृत्यू झाला याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. पाकिस्तानचे लष्कर आणि माहिती प्रसारण मंत्रालयाने देखील यावर अद्याप अधिकृत प्रतिक्रिया दिलेले नाही.

### आरोप-प्रत्यारोप

पाकिस्तान आणि अफगाणिस्तान अनेक वर्षांनंतर एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वी झालेल्या चकमकीत शेकडो नागरिकांचा मृत्यू झाला. दोन्हा देशांमध्ये शांततेसाठी चीनकडून मध्यस्थी करण्यात आली पण, या ताज्या हल्ल्यामुळे या वाटाघाटीला यश आल्याचे दिसत नाही. अफगाणिस्तान दहशतवाद्यांना आश्रय देत असल्याचा आरोप पाकिस्तानकडून करण्यात आला आहे. या दहशतवाद्यांच्या मदतीने पाकिस्तानमध्ये दहशतवादी कारवाया केल्या जात असल्याचा आरोप देखील केला जात असून, अफगाणिस्तानने हे आरोप फेटाळून लावले आहेत. दहशतवाद हा पाकिस्तानची अंतर्गत समस्या असल्याचा पलटवारही अफगाणिस्तानकडून करण्यात आला.

### अफगाणिस्तानचा इशारा

गेल्या आठवड्यात पाकिस्तानकडून अफगाणिस्तानच्या काही भागांमध्ये हवाई हल्ला करण्यात आला, यात ११ लहान मुलांसह १३ जणांचा मृत्यू झाला तर, १४ जण जखमी झाले. तर, पाकिस्तानने या हल्ल्यात २६ दहशतवादी ठार झाल्याचा दावा केला. दरम्यान, देशाच्या सुरक्षा आणि स्थैर्याला बाधा ठरेल अशा धमक्या खपवून घेणार नाही, असा स्पष्ट इशारा अफगाणिस्तानकडून देण्यात आला आहे.



# आलियाचा पलटवार

बॉलिवूडची आघाडीची अभिनेत्री आलिया भट्ट लवकरच 'अल्फा' या बहुचर्चित चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हिंदी चित्रपटसृष्टीतील 14 वर्षांच्या कारकिर्दीत तिने अनेक सुपरहिट आणि ब्लॉकबस्टर चित्रपट दिले आहेत. मात्र, तिच्या यशाइतकीच तिच्या घराणेशाहीवर वारंवार चर्चा होत असते. याविषयी तिने वारंवार खुलेपणाने आपले मत व्यक्त केले आहे. आलिया भट्ट ही प्रसिद्ध दिग्दर्शक महेश भट्ट आणि अभिनेत्री सोनी राझदान यांची मुलगी आहे. तसेच अभिनेता इम्रान हाश्मी आणि दिग्दर्शक मोहित सुरी हे तिचे चुलत भाऊ आहेत. चित्रपटसृष्टीतील मजबूत पार्श्वभूमीमुळे तिला अनेकदा घराणेशाहीच्या मुद्द्यावरून टीकेचा सामना करावा लागला आहे. करण जोहर दिग्दर्शित 'स्टुडंट ऑफ द इयर' या चित्रपटातून पदार्पण केल्यानंतर तिच्यावर अशा प्रकारच्या चर्चा रंगल्या होत्या. मात्र, या टीकेला आलियाने न जुमानता ठामपणे उत्तर दिले आहे. 'मिड-डे'ला दिलेल्या एका मुलाखतीत ती म्हणाली होती, "मी प्रत्येक वेळी स्वतःला सिद्ध करू शकत नाही. जर तुम्हाला मी आवडत नसेल, तर माझे चित्रपट पाहू नका. लोक काही ना काही बोलतच राहतात. माझ्या कामातून आणि चित्रपटांतून मी हे दाखवून देईन की मी आज ज्या स्थानावर आहे, त्यासाठी पात्र आहे."



## प्रेग्नेंट विठाबाईच्या भूमिकेतील श्रद्धा कपूरचा थरारक अभिनय

दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक इतिहासावर आधारित नवा चित्रपट घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. 'छावा'नंतर आता ते 'ईठा' या बायोपिकमधून तमाशा क्षेत्रातील दिग्गज कलाकार विठाबाई नारायणगावकर यांची जीवनकथा रुपेरी पडद्यावर सादर करणार आहेत. या चित्रपटात विठाबाई यांच्या व्यक्तिरेखेत बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री श्रद्धा कपूर झळकणार आहे. तिच्यासोबत अभिनेता रणदीप हुडा देखील देखील महत्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. नुकताच या चित्रपटाचा पहिला टीझर चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित करण्यात आला असून, प्रेक्षकांना श्रद्धाच्या लावणी नृत्यांगनेच्या भूमिकेतील दमदार झलक पाहायला मिळाली आहे. टीझरमध्ये विठाबाईंच्या आयुष्यातील एक अत्यंत भावनिक आणि धाडसी प्रसंग दाखवण्यात आला आहे. गरोदर असतानाही त्या रंगमंचावर आपली कला सादर करत राहतात. कार्यक्रमादरम्यान प्रसूतीची वेळ आल्यावरही त्या कार्यक्रम थांबवत नाहीत आणि मंचामागे जाऊन प्रसूती पूर्ण करतात, असा अंगावर काटा आणणारा प्रसंग टीझरमध्ये दाखवण्यात आला आहे.

# अंबानी कुटुंबाकडून सव्वादोन कोटींचे गिफ्ट !



अंबानी कुटुंबातील लग्नसमारंभात परफॉर्मन्स दिल्यापासून भारतात पॉप स्टार रिहाना Pop star Rihanna जास्त प्रसिद्ध झाली आहे. रिहानाला मुकेश अंबानी कुटुंबाने एक डायमंड टेनिस ब्रेसलेट भेट दिले आहे. याची किंमत २.२ कोटी रुपयांच्या घरात असल्याचे सांगितले जात आहे. रिहानाने सोशल मीडियावर समोर आलेल्या एका व्हिडिओमध्ये हे ब्रेसलेट दाखवले आणि हे तिला भारतात अंबानी कुटुंबाकडून गिफ्ट मिळाल्याचे सांगितले. रिहाना एप्रिलमध्ये तिच्या ब्युटी ब्रँडच्या कामासाठी मुंबईला आली होती, जिथे तिने अँटिलियामध्ये अंबानी कुटुंबाची भेट घेतली होती. यापूर्वी ती २०२४ मध्ये अनंत अंबानी आणि राधिका मर्चंटच्या प्री-वेडिंग फंक्शन्समध्ये सहभागी होण्यासाठी गुजरातच्या जामनगरला आली होती. त्यावेळी तिच्या लाईव्ह परफॉर्मन्सने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले होते. जामनगरच्या स्टेजवर तिने तिची प्रसिद्ध गाणी 'वर्क', 'वाईल्ड थॉट्स' आणि 'पोर इट अप' गायली होती. परफॉर्मन्सनंतर अंबानी कुटुंबाने स्टेजवर येऊन रिहानाला मिठी मारली होती. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इंस्टाग्रामवर 'द पीपल गॅलरी' नावाच्या पेजने एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये रिहाना तिच्या रोजच्या पेहराव आणि फॅशनबद्दल बोलत आहे. तिने डबल डेनिम आउटफिट घातला आहे आणि हातात सेलीन ब्रँडची बॅग घेतली आहे. व्हिडिओमध्ये रिहानाने आपला हात कॅमेऱ्यासमोर पुढे करत मनगटावर घातलेले डायमंड टेनिस ब्रेसलेट दाखवले. तिने ब्रेसलेटकडे बोट दाखवत म्हटले, "हे भारतात अंबानी कुटुंबाकडून मिळाले आहे." रिहाना नुकतीच तिच्या ब्युटी ब्रँडच्या एका प्रमोशनल इव्हेंटसाठी मुंबईत आली होती. यावेळी ती रविवारी मुकेश अंबानींच्या 'अँटिलिया' या घरीही गेली. अंबानी कुटुंबाने रिहानाचे स्वागत पूर्णपणे देसी अंदाजात केले. रिहानाने कुटुंबासोबत खास दुपारचे जेवण केले आणि घरातील सदस्यांसोबत तिने नृत्यही केले.

# ‘थप्पड प्रकरणा’चा वाद पुन्हा पेटला

## श्रीसंतचे माजी फिरकीपटू हरभजन सिंगला बॉक्सिंग रिंगमध्ये लढण्याचे आव्हान

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**आयपीएलच्या २००८ मधील पहिल्या हंगामातील वादग्रस्त ‘थप्पड प्रकरण’ क्रिकेटप्रेमींच्या स्मृतीतून अद्याप पुसले गेलेले नाही. आता इतक्या वर्षांनंतर या वादाला पुन्हा एकदा तोंड फुटले असून, भारताचा माजी वेगवान गोलंदाज एस. श्रीसंतने माजी फिरकीपटू हरभजन सिंगला थेट बॉक्सिंग रिंगमध्ये उतरण्याचे जाहीर आव्हान दिले आहे. ‘माझ्यासोबत रिंगमध्ये उतरण्याची तुझी हिंमत आहे का?’ अशा शब्दांत श्रीसंतने हरभजनवर तोफ डागली आहे.**



२००८ मधील आयपीएल सामन्यादरम्यान किंग्ज इलेव्हन पंजाब (आताचा पंजाब किंग्स) आणि मुंबई इंडियन्स यांच्यातील सामन्यानंतर हरभजन सिंगने मैदानावरच श्रीसंतच्या कानशिलात लगावली होती. या घटनेचे भारतीय क्रिकेट वर्तुळात तीव्र पडसाद उमटले होते आणि आयपीएलच्या इतिहासातील हा अत्यंत वादग्रस्त क्षण ठरला होता.

या घटनेनंतरच्या काळात दोन्ही खेळाडूंनी हा वाद मागे सोडल्याचे चित्र निर्माण झाले होते. अनेक जाहीर कार्यक्रमांमध्ये ते एकत्र दिसले, त्यांनी व्यावसायिक जाहिरातींमध्ये एकत्र काम केले आणि त्यांच्यात सलोख्याचे संबंध असल्याचे दिसून येत होते. हरभजन सिंगनेही यापूर्वी अनेकदा सार्वजनिक व्यासपीठांवर आपल्या कृत्याबद्दल खेद व्यक्त करत श्रीसंतची माफी मागितली होती.

मात्र, आता या दोन्ही माजी खेळाडूंमधील संबंध पुन्हा एकदा कमालीचे ताणले गेले आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हरभजन सिंगच्या एका ताज्या जाहिरातीमुळे हा वाद पुन्हा उफाळून आला आहे. या जाहिरातीत हरभजनने श्रीसंतचे थेट नाव न घेता, त्या ऐतिहासिक थप्पड प्रकरणाची काहीशी खिल्ली उडवल्याचे दिसून आले. यावर तीव्र आक्षेप घेत श्रीसंतने हरभजनसोबतचे सर्व संबंध पुन्हा तोडल्याचे आणि त्याला सोशल मीडियावर ब्लॉक केल्याचे जाहीर केले आहे. आपल्या आयुष्यातील एका अत्यंत वेदनादायी प्रसंगाचा वापर करून हरभजन आर्थिक फायदा लाटत असल्याचा आरोप श्रीसंतने केला आहे. इतकेच नव्हे तर, या एका जाहिरातीसाठी हरभजनला सुमारे १ कोटी रुपये मिळाल्याचा दावाही श्रीसंतने केला आहे.

### 'द लल्लनटॉप'च्या कार्यक्रमात थेट आव्हान

नुकतीच श्रीसंतने 'द लल्लनटॉप' या प्रसिद्ध डिजिटल शोमध्ये हजेरी लावली होती. या कार्यक्रमादरम्यान हरभजन आणि श्रीसंत यांचा बॉक्सिंगच्या पोशाखातील एक जुना फोटो स्क्रीनवर दाखवण्यात आला. या फोटोवर प्रतिक्रिया देताना श्रीसंतने या क्षणाचा पुरेपूर वापर करत हरभजनला थेट रिंगमध्ये दोन हात करण्याचे आव्हान दिले.

### "जाहिराती नकोत, समोरासमोर लढूया

आपले आव्हान अधिक तीव्र करत श्रीसंतने हरभजनला जाहिरातींच्या किंवा अप्रत्यक्ष टोमण्यांच्या माध्यमातून राजकारण न करता, थेट रिंगमध्ये येऊन वाद मिटवण्याचे आवाहन केले. हा आपल्या स्वाभिमानाचा विषय असल्याचे सांगत तो म्हणाला, "भज्जी, जर तुला या थप्पड प्रकरणाचा आणि माझा इतकाच त्रास आहे, आणि यातून तू इतकी कमाई करत आहेस, तर मग मलाही काही कमाई करू दे. रिंगमध्ये ये. मी तुला मनापासून साद घालत आहे. जर आपल्यात थोडा जरी स्वाभिमान शिल्लक असेल, तर जाहिरातींचे खेळ थांबवूया. सर्व मल्याळी आणि सरदार बांधवांसाठी एका खऱ्याखुऱ्या लढतीसाठी तू रिंगमध्ये ये, मी तुझी वाट पाहत आहे."

---

# योआने विसाच्या ‘गोल्डन हेडर’ गोलने इतिहासच बदलला

**महाईन्यूज । डम्बुला**

**आयुष्याच्या मैदानात जेव्हा एखादा क्रूर प्रसंग तुमच्यावर अचानक घाला घालतो, तेव्हा दोनच गोष्टी घडू शकतात—एक तर तुम्ही पूर्णपणे कोलमडून जाता, नाहीतर त्या संकटाच्या राखेतून फिनिक्स पक्षासारखी फिनिक्स भरारी घेता. काँगोचा स्टार फुटबॉलपटू योआने विसा (YOANE WISSA) याचा जीवनप्रवास म्हणजेच या अदम्य जिद्दीचे एक जिवंत आणि डोळ्यांत पाणी आणणारे उदाहरण आहे.**



१९७४ नंतर आपला पहिलाच विश्वचषक सामना खेळणाऱ्या डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगोला (डीआर काँगो) स्टार फॉरवर्ड योआने विसा याने ऐतिहासिक यश मिळवून दिले. सामन्याच्या सहाव्या मिनिटाला जोआओ नेव्हिसने गोल करून बलाढ्य पोर्तुगालला आघाडी मिळवून दिली होती; मात्र विसाने स्टॉपेज टाईममध्ये अप्रतिम हेडरद्वारे गोल करत पोर्तुगालची ही आघाडी मोडून काढली आणि सामना १-१ असा बरोबरीत सोडवला. विसाचा हा थरारक गोल काँगोसाठी तब्बल ५२ वर्षांनंतरचा पहिला विश्वचषक गोल होता. या कामगिरीमुळे हा सामना काँगोच्या फुटबॉल इतिहासात मैलाचा दगड ठरला.

या ऐतिहासिक कामगिरीच्या पार्श्वभूमीवर विसाचा भूतकाळातील संघर्ष अत्यंत प्रेरणादायी आहे. अवघ्या चार वर्षांपूर्वी एका भयानक ॲसिड हल्ल्यात दृष्टी गमावण्याचा धोका ओढवला असतानाही, या अत्यंत प्रतिकूल आणि वेदनादायी परिस्थितीतून सावरत त्याने आज फुटबॉलच्या मैदानात हे उत्तुंग यश संपादन केले.

### न्यायालयातील साक्ष

ब्रिटनमधील वेल्स न्यायालयात विसाने त्यावरील ॲसिड हल्ल्याच्या भयानक अनुभवाची साक्ष देताना सांगितले, ‘दरवाजा उघडताच माझ्या चेहऱ्यावर ॲसिड फेकले गेले, ज्यामुळे मला श्वास घेणेही कठीण झाले होते. पत्नीच्या प्रसंगावधानामुळे तातडीने शॉवरखाली डोळे धुतल्याने पुढील अनर्थ टळला. रुग्णालयात डॉक्टरांनी डोळे गंभीर भाजल्याचे सांगत दर तासाला ते स्वच्छ केले. ती वेदना एखाद्या छळासारखी होती.

### ती काळ रात्र

ऑगस्ट २०२१ मध्ये फ्रेंच क्लब 'लोरियंट'मधून ८.५ दशलक्ष पाउंड्च्या करारावर इंग्लंडच्या 'ब्रेंटफोर्ड' क्लबमध्ये सामील होण्याच्या काही दिवस आधी विसावर हा जीवघेणा हल्ला झाला होता. लोरियंट येथील त्याच्या घरी 'लॅटिटिया पी' नावाच्या महिलेने ऑटोग्राफ घेण्याच्या बहाण्याने प्रवेश करत विसाच्या कुटुंबियांसमोरच त्याच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकले आणि त्याच्या मुलीच्या अपहरणाचाही प्रयत्न केला. या गुन्ह्यासाठी न्यायालयाने दोषी लॅटिटिया पी हिला १८ वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

। शनिवार ।

दि. 20 जून 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# फुकटच्या जाहिराती; १५० कोटी रखडले

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

पिंपरी-चिंचवड शहरात विनापरवाना जाहिरातींमुळे शहराचे विद्रुपीकरण होत असताना महापालिकेच्या उत्पन्नालाही मोठा फटका बसत आहे. विद्युत खांब, रस्त्यांवरील गॅन्ट्री, उड्डाणपूल आणि भुयारी मार्गांवर मोठ्या प्रमाणावर फुकटच्या जाहिराती झळकत असतानाच त्यावर नियंत्रण आणण्यासाठी महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने तयार केलेले जाहिरात धोरण गेल्या तीन महिन्यांपासून स्थायी समितीच्या मंजुरीअभावी रखडले आहे. त्यामुळे फुकट्या जाहिरातदारांना अभय दिले जात आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.

महापालिकेच्या हद्दीत तब्बल १ लाख १४ हजार ४६२ विद्युत दिव्यांचे खांब असून त्यापैकी अनेक खांबांवर किऑक्स लावून विनापरवाना जाहिराती करण्यात येतात. बांधकाम व्यावसायिक, शैक्षणिक संस्था, क्लासेस तसेच विविध व्यावसायिकांकडून या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जाहिरातबाजी केली जाते. या जाहिरातींसाठी खासगी एजन्सींकडून शुल्क आकारले जात असले तरी त्यातील एक रुपयाही महापालिकेच्या तिजोरीत जमा होत नाही. कारवाई होईपर्यंत जाहिरातीचा उद्देश पूर्ण झालेला असतो.

याचप्रमाणे शहरातील प्रमुख रस्त्यांवरील ९७ गॅन्ट्रींवर वाढदिवस, सण-उत्सव, महापुरुषांच्या जयंती, राजकीय कार्यक्रम तसेच विविध सामाजिक उपक्रमांचे फ्लेक्स मोठ्या प्रमाणात लावले जातात. शहरातील उड्डाणपूल आणि भुयारी मार्गांवरही जाहिरातींचे प्रमाण वाढले असून त्यासाठी अद्याप कोणतेही अधिकृत धोरण अस्तित्वात नाही. परिणामी खासगी जाहिरात एजन्सी, राजकीय पदाधिकारी आणि विविध संस्था या जागांचा विनामूल्य वापर करत असल्याचे चित्र आहे.


> "किऑक्स, गॅन्ट्री, उड्डाणपूल आणि भुयारी मार्गांवरील जाहिरातींसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. स्थायी समितीची मंजुरी मिळाल्यानंतर धोरणाची तातडीने अंमलबजावणी करण्यात येईल. विनापरवाना जाहिरातींविरोधातील कारवाईही नियमित सुरू आहे."
>
> **- राजेश आगळे, उपायुक्त, आकाशचिन्ह व परवाना विभाग.**

या पार्श्वभूमीवर आकाशचिन्ह व परवाना विभागाने किऑक्स, गॅन्ट्री, उड्डाणपूल आणि भुयारी मार्गांवरील जाहिरातींसाठी क्षेत्रनिहाय निविदा प्रक्रिया पूर्ण केली आहे. या निविदांना जाहिरात एजन्सींचा चांगला प्रतिसादही मिळाला आहे. या योजनेची अंमलबजावणी झाल्यास महापालिकेला दरवर्षी सुमारे १५० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळण्याचा अंदाज आहे. मात्र, संबंधित प्रस्ताव तीन महिन्यांपासून स्थायी समितीच्या मंजुरीची प्रतीक्षा करत असल्याने महापालिकेला कोट्यवधी रुपयांच्या संभाव्य महसुलापासून वंचित राहावे लागत आहे.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026



DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.
It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.

UG/PG Programs

- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# वीकेंडलाही मालमत्ता कर काऊंटर सुरू

## सवलतींचा लाभ घेण्यासाठी शेवटचे १२ दिवस शिल्लक; महापालिकेच्या वतीने आवाहन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाकडून नागरिकांना देण्यात आलेल्या विविध कर सवलतींचा अधिकाधिक लाभ घेता यावा यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मालमत्ता कर भरण्यासाठी शनिवार व रविवारी (२० व २१ जून तसेच २७ व २८ जून) महापालिकेच्या सर्व १८ विभागीय कर संकलन कार्यालयांमधील कॅश काऊंटर सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत सुरू राहणार असल्याची माहिती कर संकलन विभागाच्या वतीने देण्यात आली आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत १८ जून पर्यंत ३८१ कोटी ६० लाख रुपयांचा कर भरणा झाला आहे.**



महापालिकेच्या वतीने दरवर्षी आर्थिक वर्षाच्या प्रारंभी मालमत्ताधारकांना विविध सवलती जाहीर केल्या जातात. यंदाही ३० जून २०२६ पर्यंत कर भरणाऱ्या नागरिकांसाठी आकर्षक सवलती उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागरिकांपर्यंत सवलतींची माहिती पोहोचवण्यासाठी कर संकलन विभागाकडून एसएमएस, दूरध्वनीद्वारे संपर्क, जनजागृती मोहिमा, होर्डिंग्ज, सामाजिक माध्यमे तसेच विविध प्रचार माध्यमांचा वापर करून सातत्याने आवाहन करण्यात येत आहे. याशिवाय प्रत्येक विभागीय कार्यालयातील सहायक मंडल अधिकारी आणि गट लिपिक मालमत्ताधारकांशी थेट संपर्क साधून त्यांना कर भरण्यासाठी प्रोत्साहित करत आहेत.

या प्रयत्नांमुळे चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये कर संकलनाला गती मिळाली असून आतापर्यंत मोठ्या प्रमाणात कर वसुली झाली आहे. ऑनलाइन कर भरण्याची सुविधा उपलब्ध असली तरी अनेक नागरिक प्रत्यक्ष कार्यालयात येऊन रोखीने किंवा इतर माध्यमांतून कर भरत आहेत. त्यामुळे नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आणि शेवटच्या दिवसांतील गर्दी कमी करण्यासाठी शनिवार व रविवारीही कॅश काऊंटर सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महापालिकेच्या वतीने सर्व मालमत्ताधारकांना आवाहन करण्यात येत आहे की, उपलब्ध सवलतींचा लाभ घेण्यासाठी ३० जून २०२६ पूर्वी मालमत्ता कर भरावा आणि शहर विकासात आपले योगदान नोंदवावे.

> “ शहराच्या प्रगतीमागे करदात्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य आणि इतर नागरी सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी नागरिकांनी वेळेत मालमत्ता कर भरणे आवश्यक आहे. महापालिकेने दिलेल्या सवलतींचा लाभ घेत प्रत्येक नागरिकाने ‘माझा कर, माझे शहर’ ही भावना जपावी.
>
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

> “ करदात्यांना अधिक सुलभ आणि नागरिकाभिमुख सेवा देण्याच्या उद्देशाने शनिवार व रविवारीही कॅश काऊंटर सुरू ठेवण्यात आले आहेत. नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये यासाठी महापालिका सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. उपलब्ध सुविधांचा उपयोग करून नागरिकांनी अंतिम मुदतीपूर्वी कर भरणा करावा.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# ‘भारत भाग्य विधाता’ या चित्रपटाच्या टीमने घेतली महापौर रवि लांडगे यांची भेट

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**अभिनेत्री तथा खासदार कंगना रानौत निर्मित “भारत भाग्य विधाता” हा हिंदी चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला असून, या चित्रपटाचे दिग्दर्शक मनोज तापडिया, चित्रपट निर्मात्या बबीता अशीश्वाल तसेच अभिनेत्री गिरिजा ओक आणि स्मिता तांबे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांची आज सदिच्छा भेट घेतली.**



या भेटीदरम्यान चित्रपटाच्या निर्मितीमागील संकल्पना, कथानक आणि समाजाभिमुख विषयांबाबत चर्चा करण्यात आली. महापौर रवि लांडगे यांनी चित्रपटाच्या यशासाठी शुभेच्छा देत चित्रपटाच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. यावेळी महा मेट्रो पीसीएमसीच्या ब्रँड ॲम्बेसेडर संगीता तरडे तसेच जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले, ‘चित्रपट हे समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे. ‘भारत भाग्य विधाता’सारखे चित्रपट समाजात सकारात्मक विचार रुजविण्याचे कार्य करतात. अशा आशयघन आणि प्रेरणादायी चित्रपटांच्या माध्यमातून देशभक्ती, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय मूल्यांचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचतो. चित्रपटाच्या संपूर्ण टीमला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.’

# लोणावळ्यात १०५ वाहनचालकांवर कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

वाहनांना काळ्या काचा, बिना नंबर प्लेटच्या दुचाकी चालवणे, कर्णकर्कश आवाज करणारे सायलेन्सर गाड्यांना बसवणे, नो पार्किंगमध्ये वाहने उभे करणे, असे प्रकार करणाऱ्या तब्बल १०५ जणांवर लोणावळा शहर पोलिसांनी आज 18 जून रोजी कारवाई करत तब्बल एक लाख तीन हजार रुपयांचा दंड केला आहे. लोणावळा शहरचे नवनिर्वाचित पोलिस निरीक्षक सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

लोणावळा शहरामध्ये अनेक चारचाकी वाहने ही काळ्या काचा करून चालवली जातात, अनेक तरुण मुले गाड्यांच्या नंबर प्लेट काढून दुचाकी वाहने चालवत असल्याचे निदर्शनास आले होते, अशा वाहनांवर या आज मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली.

दुचाकीच्या सायलेन्सरमध्ये बदल करत कर्णकर्कश आवाज करणारे व फटाके वाजवणारे सायलेन्सर असणाऱ्या दुचाकी गाड्यांचे सायलेन्सर काढून जप्त करण्यात आले. तसेच नो पार्किंगमध्ये रस्त्यावर वाहने उभी करत रहदारीला अडथळा निर्माण करणारी वाहने अशा प्रकारच्या एकूण 105 वाहनांवर दिवसभरात ही कारवाई करण्यात आली.

> “ काळ्या काचा, फॅन्सी नंबर प्लेट, नंबर प्लेट न लावता वाहने चालवणे अशा प्रकारच्या वाहनांवर या पुढील काळात देखील कडक कारवाई करण्याच्या सूचना वाहतूक विभागाला दिल्या आहेत. नगरसेवक, आमदार, खासदार असे वेगवेगळे स्टिकर वाहनांवर लावून वाहने चालवणाऱ्यांवर देखील गुन्हे दाखल करणार असल्याचे त्यांनी सांगितले.
>
> **- सचिन पाटील, पोलिस निरीक्षक, लोणावळा.**

# कचरा नियमांची सक्ती आणि कारवाई तुर्तास रोखा!

## पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनच्या मागणीला लोकप्रतिनिधींचाही सकारात्मक प्रतिसाद

**महाईन्यूज** । पिंपरी- चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांवर (Bulk Waste Generators) घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये करण्यात येणाऱ्या दंडात्मक कारवाईला तात्काळ स्थगिती देण्यात यावी, अशी मागणी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. नियमांची व्यवहार्यता न तपासता थेट दंडात्मक कारवाई केल्यास नागरिकांमध्ये भीतीचे व असंतोषाचे वातावरण निर्माण होऊ शकते, याकडे देखील त्यांनी लक्ष वेधले आहे.**



महापालिका प्रशासनाने घनकचरा व्यवस्थापनांतर्गत गृहनिर्माण सोसायट्या व व्यावसायिक आस्थापनांना नोटिसा पाठवण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार शंकर जगताप यांनी आयुक्तांची भेट घेऊन त्यांना निवेदन देत जनभावना प्रशासनासमोर मांडल्या.

आमदार जगताप यावेळी म्हणाले, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत कचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीने महापालिकेचे पाऊल स्वागतार्ह आहे. मात्र, या नियमांच्या अंमलबजावणीबाबत नागरिक, गृहनिर्माण संस्था (सोसायट्या) आणि व्यावसायिक आस्थापना यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणावर संभ्रम, अस्वस्थता आणि असंतोष निर्माण झाला आहे.

अनेक गृहनिर्माण संस्थांना 'BWG' म्हणून लागू होणाऱ्या निकषांची, आवश्यक तांत्रिक सुविधांची आणि आर्थिक तरतुदींची पुरेशी माहिती उपलब्ध झालेली नाही. ऑनलाइन नोंदणी प्रक्रियेत अडचणी येत असून, सोसायट्यांकडे ओला कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक जागा, तांत्रिक मनुष्यबळ व आर्थिक क्षमता उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत थेट दंडात्मक किंवा फौजदारी कारवाईचा बडगा उचलल्यास नागरिकांमध्ये नकारात्मक भावना वाढीस लागेल, अशी भीती आमदारांनी व्यक्त केली आहे.

> पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापन स्वागतार्ह असले, तरी सोसायट्यांवर थेट दंडात्मक कारवाईची टांगती तलवार ठेवणे चुकीचे आहे. नागरिकांकडे पुरेशी जागा, तांत्रिक माहिती आणि आर्थिक क्षमता नसताना प्रशासनाने थेट फौजदारी कारवाईचा बडगा उगारणे अन्यायकारक आहे. महापालिकेने या दंडात्मक कारवाईला तात्काळ स्थगिती देऊन, आधी नागरिकांशी चर्चा करावी, व्यापक जनजागृती करावी आणि एक व्यावहारिक कृती आराखडा जाहीर करावा. नागरिकांमधील संभ्रम व असंतोष दूर करण्यासाठी आयुक्तांनी सर्व घटकांची संयुक्त बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा आणि सोसायट्यांनी पूर्ततारी करण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा.
>
> - आमदार शंकर जगताप (चिंचवड विधानसभा).

### काय आहेत आमदारांच्या प्रमुख मागण्या

- महापालिकेने प्रस्तावित केलेली दंडात्मक व फौजदारी स्वरूपाची कठोर कारवाई तुर्तास स्थगित करावी.
- व्यापक जनजागृती व मार्गदर्शन: नियमांची अंमलबजावणी करण्यापूर्वी सर्व संबंधित घटकांची चर्चा करून व्यापक जनजागृती मोहीम राबवावी आणि स्पष्ट मार्गदर्शक सूचना प्रकाशित कराव्यात.
- 'BWG' संदर्भातील दंडात्मक व फौजदारी कारवाईस स्थगिती देऊन, सर्वपक्षीय एक संयुक्त बैठक महापालिकेने तातडीने आयोजित करावी.
- नागरिकांना या नियमांचे पालन करण्यासाठी आणि आवश्यक यंत्रणा उभारण्यासाठी वाजवी व पुरेसा कालावधी देण्यात यावा.

# घरबसल्या मिळणार बांधकाम परवाने; पीएमआरडीएकडून सिंगल विंडो सिस्टीम गतिमान!

**महाईन्यूज** ।
पिंपरी- चिंचवड

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) नागरिक आणि बांधकाम व्यावसायिकांसाठी एक अत्यंत महत्त्वाचा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. पीएमआरडीए क्षेत्रात घरबसल्या सर्व परवानग्या आणि नागरिक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्राधिकरणाने सिंगल विंडो सिस्टीम (एकात्मिक एक खिडकी योजना) अधिक गतिमान केली आहे.**




या पारदर्शक प्रणालीमुळे आता विविध मंजुरींसाठी शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवण्याची गरज पूर्णपणे संपुष्टात आली असून, लालफितीच्या कारभाराला मोठा चाप बसणार आहे. पीएमआरडीएच्या अवाढव्य क्षेत्रात नवीन गृहप्रकल्प किंवा वैयक्तिक बांधकाम सुरू करताना विकासक आणि नागरिकांना यापूर्वी विविध विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) मिळवण्यासाठी मोठी कसरत करावी लागत होती.

मात्र, या नव्या एक खिडकी सुविधेमुळे बांधकाम परवाना, भोगवटा प्रमाणपत्र (ओसी), हद्दींचा नकाशा आणि इतर सर्व आवश्यक परवानग्या एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, तसे आदेश महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी काढले आहेत. यामुळे प्रशासकीय विलंबाची डोकेदुखी थांबणार आहे.

नागरिकांची कामे वेळेत पूर्ण व्हावीत आणि कारभारात कमालीची पारदर्शकता यावी, यासाठी पीएमआरडीएने ई-ऑफिस प्रणालीचा प्रभावी वापर सुरू केला आहे.

या सुविधेचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे फाईल ट्रॅकिंग सिस्टीम नागरिक किंवा विकासकांना आपली फाईल सध्या कोणत्या अधिकाऱ्याकडे किंवा नेमकी कोणत्या टेबलावर प्रलंबित आहे, याची माहिती केवळ एका क्लिकवर ऑनलाईन पाहता येणार आहे. यामुळे एजंटगिरीला आळा बसेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### सिंगल विंडोची वैशिष्ट्ये

- बांधकाम परवाना, भोगवटा पत्र, नकाशा मंजुरी एकाच ठिकाणी
- फाईलच्या सद्यस्थितीची ऑनलाईन माहिती
- मानवी हस्तक्षेप टाळून थेट कागदपत्रे ऑनलाईन उपलब्ध
- प्रशासकीय मंजुरीच्या कालावधीत मोठी घट

### अर्ज मंजुरीचा वेळ होणार कमी

या डिजिटल क्रांतीमुळे शासकीय प्रक्रियेतील थेट मानवी हस्तक्षेप पूर्णपणे टळणार आहे. परिणामी, भ्रष्टाचाराला वाव न राहता संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता येईल. अर्ज मंजुरीसाठी लागणारा वेळ कमालीचा कमी झाला असून, यामुळे पुणे महानगर प्रदेशातील पायाभूत सुविधा आणि रिअल इस्टेट क्षेत्राला मोठी गती मिळण्याची चिन्हे आहेत.

> नागरिकांना पारदर्शक आणि जलद सेवा देणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. सिंगल विंडो सिस्टीम आणि ई-ऑफिसमुळे थेट कार्यालयात न येता घरबसल्या बांधकाम परवाने आणि भोगवटा पत्रे मिळवणे शक्य झाले आहे. यामुळे वेळेची बचत तर होईलच, शिवाय प्रशासकीय उत्तरदायित्वही वाढेल.
>
> - रूपाली आवले-डंबे, सहआयुक्त, पीएमआरडीए


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway Station